Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**संदीप प्रताप वाहुळे**
**एम.फिल. २०१३-१५**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा**
**विदयापीठ, औरंगाबाद**


**प्रस्तावना**

मनुष्य हा पर्यावरणानेच आपत्य होय भारतीय संस्कृतीमध्ये पर्यावरणास अत्यंत महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. मनुष्याचे शरीर व्याप (जल), तेज(अग्नी),वायू आकाश, पृथ्वी (खनिजे मुलतत्वे )अशा पंचमहाभूताचे बनले आहे हे सत्य भारतीयांनीच सर्व प्रथम जगासमोर मांडले. आधुनिक विज्ञानाचे सुध्दा वरील सत्यास दुजोरा दिला कारण मनुष्याच्याच नव्हे तर प्रत्येक सजीवाच्या शरीराच्या ९९ टक्के भाग -ऑक्सिजन, ६२ टक्के कार्बन, २० टक्के उदजन, १० टक्के नायट्रोजन, ३ टक्के कॅशिल्यम, २.५ टक्के फॉस्पोरस, १.१४ टक्के क्लोरिन ०.१६ टक्के सल्फर, गंधक ०.१४ टक्के आणि पोटॅशियम ०.११ टक्के यांचा मिळून बनलेला असतो.

मनुष्य हा पर्यावरणाचे एक अविभाज्य अंग होय. सजीव आणि निर्जीवांचे अस्तित्वसुध्दा पर्यावरणाच्या स्थितीवर अवलंबुन नसते पर्यावरणाच्या गुणवत्तेचा परिणाम सजीवांवर प्रत्यक्षपणे व त्वरीत होते तर निर्जिवावर हा परिणाम मंदगतीने होते हे अभ्यासण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची अत्यंत गरज आहे

**पर्यावरण समस्या**

पर्यावरणविषयक समस्याचे क्षेत्र अत्यंत व्यापक असून मानवी जीवनाच्या जवळ जवळ सर्वच पैलूना या समस्या स्पर्श करतात. या समस्या पुढील प्रमाणे आहेत.



वरील आकृतीवरून पर्यावरणविषयक समस्यांची व्यापकता सहज ध्यानी येते परंतू समस्या कितीही मोठी असली तर तीचे समाधान शिक्षणाच्या माध्यमातून शोधता येते सर्व समस्याविरूध्द लढण्यासाठी शिक्षण ही एक धारदार तलवार व अभेदय ढाल अशी दुहेरी भूमिका बजावते म्हणून पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.

**पर्यावरणशिक्षण**

**व्याख्या**

"पर्यावरण शिक्षण म्हणजे एक असा शैक्षणिक नवोपक्रम ध्येय कि, ज्यांच्या माध्यमातून विदयार्थ्यांमध्ये पर्यावरणाच्या विविध घटक्‍ाविषयी जागृती निर्माण्ध केली जाते."

" पर्यावरणातील विविध घटकांचे विश्लेषण करून त्यांच्या परस्परांसबंध विशद करण्याची प्रकिया म्हणजे पर्यावरण होय."

"विदयार्थ्यांना पर्यावरणविषयी ज्ञान देवून त्यांच्या अंगी पर्यावरण संवर्धनविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याची प्रकीया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय."- डॉ आर.सी.शर्मा-युनेस्को विशेषतज्ञ

"विदयार्थ्यांना व नागरिकांना पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक दिशेने कार्य करणाऱ्या कारकांची व घटकांची जाणीव देवून त्यांच्यामध्ये पर्यावरणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्याकरीता अर्गित ज्ञानाचे उपयोजक करण्याची क्षमता निर्माण करणारा शैक्षणिक उपक्रम म्हणजेच पर्यावरण शिक्षण होय." - डॉ.भांडारकर


**संकल्पना-**

Concept पर्यावरण शिक्षण हि एक अत्याधुनिक संकल्पना असून या संकल्पनेचा उगम सामाजिक आणि राष्ट्रीय गरजामधून इ.स.१९६० चे सुमारास झाला. पर्यावरण अभ्यास environment studies या ज्ञानशाखेचा पर्यावरण शिक्षण हा नवोउपक्रम होय.

शिक्षण ही जीवनाची संपूर्ण तयारी होय असे मानले जाते पर्यावरण हे मनुष्य जीवनाशी अत्यंत निगडीत आहे किबहुना मनुष्य व पर्यावरणाचेच आपत्य आहे पर्यावरण सर्वेधन हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे पर्यावरणाची गुणवत्ता दिवसेदिवस ढासळत आहे आजचे विदयार्थी उदयाचे नागरिक आहेत आणि त्यांना पर्यावरणाविषयी ज्ञान देणे अत्यंत गरजेचे आहे. निसर्ग हा अनमोल ठेवा आहे तो एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यत अबाधित राहील. तसेच येणाऱ्या पिढयांच्या गरजा भागविण्यास सक्षम राहील या बाबतीची दक्षता प्रत्येक विदयार्थ्यावर व तसेच प्रत्येक नागरिकाने घेणे आवश्यक आहे.

पर्यावरण ही संकल्पना अत्यंत व्यापक असून या संकल्पनेत अनेक क्षेत्राचा कारकांचा घटकांचा आणि क्रिया प्रक्रियांचा समावेश होतो काही घटक प्रक्रिया या नैसर्गिक स्वरूपाच्या असतात तर काही मानवनिर्मित असतात.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015




**पर्यावरण शिक्षणाची गरज**

पर्यावरणाशी निगडीत समस्यांची यादी करणे हे एक न संपणारे कार्य आहे उदा. जमीन , पाणी, हवा यांचे प्रदुषण, अवकाश व ध्वनी प्रदुषण, पर्यावरणाच्या विविध प्रणालीचे असंतुलन नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ऱ्हास, ओझान तुटवडा वाळवंटीकरण धास्तवलेले वन्य जीवन, उर्जा आणिबाणी जमीनीची धुप इत्यादी.

अशा प्रकारच्या समस्यावर उपाय शोधण्यासाठी पर्यावरण शिक्षण या शाखेचा उदय झाला आहे व विकास होत आहे.

पर्यावरणाच्या सद्यस्थितीतील ज्वलंत समस्याची जगातील सर्वत्र शास्त्रज्ञांना जाणीव आहे. वास्तविक सर्वसामान्य मानसाचे अधिक नुकसान होत आहे मात्र दुसऱ्या पिढयांना याचे दुष्यपरिणाम भोगाव लागत आहेत यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज आहे. सामाजिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गरजामधून पर्यावरण शिक्षणाची निर्मिती झाली आहे विशेष करून तिसऱ्या जगात लोकसंख्येचा प्रस्फोट हे पर्यावरणीय समस्यांच्या प्रमुख कारणापैकी एक महत्वाचे कारण आहे उपलब्ध साधनसंपत्ती दिवसेदिवस अपुरी पडत आहे आणि ती संपते आहे साधनसंपत्तीच्या असा अमाप वेसुमार वापर करून तिचे शोषण करण्यात ती संपविण्यात तथा कथित प्रगत राष्ट्रे सर्वाधिक जबाबदार आहेत वाढत्या लोकसंख्येपेक्षा हेच कारण नैसर्गिक साधन संपत्तीच्या ऱ्हासाला अधिक जबाबदार आहे.

हि वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन विशेष गेल्या दशकात जगभरात राजकारणी आणि शासन यांनी पर्यावरणाचा ऱ्हासाची दखल घेतली आहे तो थांबवण्यासाठी तसेच याबददलची जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी त्यादिशेने त्यांनी पावले टाकली आहे उदा. चिपको आंदोलनासारख्या मोहिम अशासकीय संघटना मार्फत चालतात.

पर्यावरण शिक्षणाचे स्वरूप -

UNESCO व UNEP यांनी १९७७ मध्ये जॉर्जियामधील तबिलसी येथे भरवलेल्या परिषदेमध्ये पर्यावरण शिक्षणाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

- पर्यावरण शिक्षणामध्ये पर्यावरणाचा साकल्याने विचार होणे अपेक्षित आहे नैसर्गिक व मानवनिर्मित, तंत्रविज्ञानिक व समाजिक पर्यावरणाचा.
- विविध विद्याशाखेमधून संबंधित आशय सर्वकष व संतुलित दृष्टीकोन असलेला आंतरविदयाशाखीय उपागम त्यामध्ये गृहीत आहे.
- पर्यावरण शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडताना प्राप्त तसेच भविष्यकालीन पर्यावरणीय परिस्थितीवर प्रकाश टाकणे उपयुक्त ठरेल.
- पर्यावरणीय समस्यावर तोंडगा काढण्यासाठी आणि त्यांना प्रतिबंध घालण्यासाठी आवश्यक ती मुल्य रूजवणे आणि स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य मिळवण्याची गरज लक्षात आणून देणे यावर भर आहे.
- पर्यावरण शिक्षणात अध्ययन अनुभवांच्या निगडीत विदयार्थ्यांना स्थान मिळावे निर्णय होण्याची व त्यांचे परिणाम स्विकारण्याची संधी त्यांना मिळावी.

**कालांतराने १९८१ मध्ये युनेस्कोने पर्यावरण शिक्षणाचा स्वरूपाबददल पुढील विचारं मांडले.**

- औपचारकि शिक्षणप्रणालीचा सर्व स्तरावर पर्यावरण शिक्षणाचा अंर्तभाव झाला पाहिजे.
- यांचे स्वरूप अंतरविदयाशाखीय असे असावे
- एखादया समस्येच्या सर्वांगीण अभ्यास करता यावा असा सर्वकर्ष दृष्टीकोन त्यामध्ये स्विकारला जावा
- दैनंदिन जीवनातील व्यावहारिक समस्यावर त्यांचे लक्ष केद्रीत करावे.
- मुल्यनिर्मिती हे त्यांचे ध्यान असावे.

**पर्यावरण शिक्षणाची गुणवैशिष्टये -**

पर्यावरण शिक्षणाची गुणवैशिष्टये ही शैक्षणिक आशयाच्या स्वरूपाची संरचनेची त्याचप्रमाणे अध्ययन कार्याशी संबंधीत आहेत.

१. मानवाच्या पर्यावरणाच्या प्रमुख व्यावहारिक समस्यावर तोंडगा काढणे हे पर्यावरणाचे शिक्षणाचे ध्येय आहे.त्यासाठी आंतरविदयाशाखीय अभिगम अभिप्रत आहे ते प्रादेशिक त्याचप्रमाणे जागतिक दृष्टीकोनाचा अवलंब करून भविष्याचा वेध घेणारे आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

२. पर्यावरण शिक्षणातील समस्या निराकरण या अभिगभामुळे पर्यावरणीय आणिबाणीवर तोंडगा काढण्यात येतो येणाऱ्या अडथळयाची तसेच वैयक्तिक सामुहिक स्वास्थाची जाणीव निर्माण होते.

३. पर्यावरण शिक्षणात पर्यावरणविषयक कौशल्ये, मुल्य व अभिवृत्ती लोकामध्ये विकसित करण्यावर भर दिला जातो त्यास अनुसरून विविध प्रकारे शिक्षणाचे आयोजन केले जाते.

४. शोध आणि बोध या प्रक्रियेव्दारे स्वत:च्या विकास घडवण्यास पर्यावरण शिक्षण मुलांना मदत करते भोवतालच्या घटनाच्या शोध घेणे निरीक्षण करणे त्याचे मुल्यमापन करणे यातून स्व अध्ययन करण्यात मुले व्यस्त राहतात आणि कधी कधी एखादा संशोधनाची भूमिका बजावल्याच्या भावनेतून आंनदी होतात.

**पर्यावरण शिक्षणाची उदिदष्टे व ध्येय**

सर्वसामान्यपणे कोणताही शैक्षणिक अभ्यासक्रम पाहिल्यावर असे लक्षात येते की त्याची उदिदष्टये व्यक्तीला जीवन पूर्णपणे जगता येण्याची पूर्णतयरी करणे हेच असते व्यक्तिचा संपूर्ण विकास हेच ध्येय असते यामध्ये बौध्दीक मानसिक, विकास त्याचबरोबर त्यांचा स्वत:ला व इतराला फायदा घेणे अंतर्भूत असते हे सर्व साध्य होण्यासाठी पर्यावरण शिक्षण एक उत्कृष्ट माध्यम आहे

१. आर्थिक सामाजिक, राजकीय व बाबतीत शहरी व ग्रामीण भागातील परस्परावलबित्वाबददल स्पष्ट जाणीव निर्माण करणे ती जोपासणे आणि त्याबददलची आशा निर्माण करणे.

२. पर्यावरणाचे गुंतागुतीचे स्वरूप समजण्यास मानवाला सक्षम बनविणे.

३. पर्यावरणाचे विकासातील महत्व व त्याविषयी गुणग्राहकता शिकविणे.

UNESCO व UNEP यांना मिळून १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अस्तित्वात आणला आणि तेव्हापासून तो हळू हळू विस्तार पावतो आहे तविलसी १९७७ मॉस्को १९८७ येथे झालेल्या त्यांच्या दोन सभामध्ये त्यांनी पर्यावरण शिक्षणासाठी एक आराखडा निश्चित केला पर्यावरण समस्या व त्याबददलचे ज्ञान यात सतत भर पडते आहे म्हणून या आराखडयात औपचारिक शालेय शिक्षण घेत असलेल्या व शाळाबाहय सर्व वयोगटातील तसेच निरंतर स्वरूपासाठीचे स्थानिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरून पर्यावरण शिक्षणाची ध्येय निश्चित केली आहे.

१. पर्यावरणाची संबंधित व ससंगत ज्ञानाचे सात्मीकरण घडून आणणे.

२. पर्यावरणाच्या संरक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभागी होण्यासाठी उत्तेजन देणे व पर्यावरणाबददल सकारात्मक अभिवृत्ती विकसित करणे.

३. सर्वाचा सक्रिय सहभाग मिळवणे.

**समारोप**

पर्यावरण शिक्षणाच्या का या पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे नैसर्गिकरित्या जीवन जगता येईल निसर्गातील सौदर्यचिरथ्याशी असेल पुरेशी साधनसंपत्ती उपलब्ध असेल असे जग पुढच्या पिढीला सक्षम करता आले पाहिजे यासाठी पर्यावरण शिक्षणाची निंतांत गरज आहे.